**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ नागपूर यांचे कार्यालय**
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा. वनभवन रामगिरी रोड,सिव्हील लाईन्स नागपूर-440001 दुरध्वनी क्र. 0712-2556912, फॅक्स क्र. 0712-2553018
**EmailID :mahaecotourism@mahaforest.gov.in**

जावक क्रमांक कक्ष-मुले/मनिपमं/यो/प्रक्र. निपप्र- /१२५ /१६-१७ नागपूर- दि. ०२/०८/२०१६.

प्रति,
१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर
२. व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचे प्रतिनिधी
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), म.रा. नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा. नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव , पश्चिम , मुंबई
८. श्री.संजय करकरे, सहायक संचालक, बी.एन.एच.एस.बी-१, वंदना अपार्टमेंट, रामदास पेठ, नागपूर
९. श्रीनिधी नांदेडकर ॲण्ड असोसिएटस, नागपूर १०३, उत्कर्ष उमंग, अजनी चौक, नागपूर -१५
१०.प्रो.निशी के.मुखर्जी , ४६ रामदासपेठ, लोकमत बिल्डींग जवळ, नागपूर-१०
११. श्री.दिलीप रामभाऊ चिंचमलातपूरे, केळीबाग रोड, महाल, नागपूर -३२

**विषय :-** महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या (Executive Committee) दिनांक २० ऑगष्ट, २०१६ च्या सभेचे कार्यवृत्तांत.

दि. २०/०८/२०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या सभेचे कार्यवृत्तांत माहितीस्तव पाठविण्यात येत आहे.

स्वा/-

**सहपत्र- वरीलप्रमाणे.**

सदस्य सचिव
तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

प्रतिलिपी - प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ यांचे स्वीय सहायक यांना अग्रेषित. वरील कार्यवृत्तांत महोदयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे ही विनंती.

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० ऑगष्ट, २०१६ रोजी आयोजित द्वितीय सभेचा कार्यवृत्तांत.

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची द्वितीय बैठक शनिवार दिनांक २० ऑगष्ट, २०१६ रोजी दुपारी ०३.०० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे अध्यक्षतेखाली "वनभवन" रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समितीचे सदस्याची व निमंत्रित अधिका-यांची यादी सोबत जोडली आहे (परिशिष्ट-१).

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य सचिव यांनी द्वितीय बैठकीच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष व इतर उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले. नवनियुक्त नामनिर्देशित सदस्यांचा परिचय करुन दिले. मंडळाचे स्थापना, उददेश, आतापर्यंतच्या प्रगती बाबत अवगत करुन दिले व बैठकीत ठेवण्यात आलेल्या विषयांबाबत प्रस्ताविक सादरीकरण केले. त्यानंतर विषयसूचीप्रमाणे मुददेनिहाय चर्चा झाली. बैठकीत देण्यात आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**विषय क्रमांक १ :- दिनांक १०.०५.२०१६ रोजी टकले सभागृह, वनभवन, नागपूर येथे झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक १०.०५.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्र.व्य.सं'(निपविमं)/प्र.क्र.१०/१८/२०१६-१७, दिनांक १३.०५.२०१६ अन्वये सर्व सभासदांना पाठविण्यात आलेला असून सदर कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्याकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणा करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात यावे अशी सदस्य सचिव

यांनी मंडळास विनंती केली. कार्यवृत्तांत कायम करण्यात आले.

**विषय क्रमांक २ :- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितीच्या दिनांक १०.०५.२०१६ रोजी घेण्यात घेण्यात आलेल्या निर्णयावर झालेली कार्यवाही.**

याबाबतची माहिती मंडळाचे समितीसमोर ठेवण्यात आली व दिनांक १०.०५.२०१६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती द्वितीय बैठकीच्या विषय सुची समवेत परिशिष्ट- २ म्हणून जोडण्यात आली असल्याचे सर्व सन्माननीय सदस्यांचे निदर्शनास आणून दिले व त्यास समितीने मान्यता प्रदान केली व कार्यवाही न झालेल्या मुददांवर कार्यवाही पूर्ण करावी असे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ३ :- नवीन निसर्ग पर्यटन स्थळांचे प्रकल्प आराखडयांना मान्यता देणे.**

निसर्ग पर्यटन धोरणाचे प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी मंडळाची स्थापना करण्यात आली त्यामुळे मंडळाचे स्थापनेनंतर या कार्यक्रमामध्ये गुणात्मक दृष्य परिणाम साध्य करणेसाठी प्रकल्प आराखडयाचा दर्जा सुधारणे आवश्यक असल्याचे व्यवस्थापकीय संचालक, म.नि.प.वि.मं, नागपूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर बैठकीकरीता निमंत्रित क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांचे क्षेत्रात निसर्ग पर्यटन विकासाकरीता निवडण्यात आलेल्या स्थळांचे प्रकल्प आराखडा चे सादरीकरण केले.

| अ.क्र. | प्रकल्प आराखडा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **३.१** | **निसर्ग पर्यटन संकुलाचे दुरुस्तीबाबत विकास आराखडा (एफडीसीएम) मोहुर्ली / कोलारा (महाव्यवस्थापक, उत्तर चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर)** | महाव्यवस्थापक, उत्तर चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र क्र.महाव्य/उचंप्र/निप/१६-१७/११०७, दिनांक ५.७.२०१६ अन्वये वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षाकरीता ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणा-या मोहुर्ली व कोलारा येथील निसर्ग पर्यटन संकुले दुरुस्तीबाबत विकास आराखडा सादर केला आहे. उक्त आराखडयाची किंमत रु.१७०.२४ लक्ष आहे.<br>सन २०१२ पासून वनविकास महामंडळाला मोहुर्ली व कोलारा संकुल सोपविण्यात आलेले आहे. सन २०१४-१५ ते २०१५-१६ या कालावधी सरासरी दरवर्षी ८००० पर्यटकांनी या निसर्ग पर्यटन संकुलांचा उपभोग केला आहे.<br>निसर्गपर्यटन राज्ययोजनातंर्गत भांडवली स्वरुपाचे कामे करणे अपेक्षित असल्याने दुरुस्ती तसेच परीरक्षण संबंधीचे बाबींवर खर्च अपेक्षित नाही. त्यामुळे प्रकल्प आराखडयात त्याप्रमाणे दुरुस्ती करुन सुधारित आराखडा सादर करणे आवश्यक आहे. | प्रकल्प आराखडयात समितीने सुचविलेल्या सुधारणा समाविष्ट करण्याच्या अटीवर आराखडयास मंजूरी देण्यात आली आहे. |
| **३.२** | **भोरगिरी अंतर्गत भोरगड किल्ला - मुवसं(वजी) पुणे** | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.ब/कक्ष-४/वजी/मुवसं/यो/१७/१६-१७, दिनांक ६.४.२०१६ अन्वये सन २०१५-१६ ते २०१८-१९ अशा तीन वर्षाचा आराखडा सादर केलेला आहे. आराखडयाची एकूण रक्कम रु.३६६.३३ लक्ष आहे. | प्रस्तावाचे सादरीकरण करण्याकरीता संबंधित अधिकारी उपस्थित झाले नसल्याने पुढीलसभेत विषय ठेवण्यास निर्णय घेण्यात आलेला आहे. |
| **३.३** | **मौजे मेरगळवाडी (गुप्तेश्वर) दौड वनपरिक्षेत्र जि. पुणे - मुवसं (प्रा) पुणे** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक २२.०६.२०१६ अन्वये मौजे मेरगळवाडी (गुप्तेश्वर) येथील परिसरामध्ये निसर्ग पर्यटन विकास करण्यासाठी पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने 3 वर्षाचा (सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीचा ) रु.२००.५६ लक्षचा आराखडा सादर केला आहे. सदर आराखडयातील प्रस्तावित कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरण केलेले आहे.<br>सदर स्थळ पुणे शहरापासून ४५ कि.मी. अंतरावर स्थित असून त्या परिसरात उजाड वने आहे. सदर स्थळास दरदिवशी ३००-३५० पर्यटक भेट देत असतात. निसर्ग पायवाट तयार करणे, वनतळी करणे, माहिती फलक लावणे, लाकडी आभासाची कमान तयार करणे, झाडाभोवती ओटे तयार करणे, सौर दिवे बसविणे, निसर्ग शिक्षण हब तयार करणे, सिटींग बेंचेस इत्यादी कामे प्रस्तावित आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समिती,मेरगळवाडी मार्फत सदर स्थळाचे परीरक्षण करणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी १०८७२ मनुष्य दिवस रोजगार निर्मीत होणार आहे. | प्रकल्प आराखडयास मंजूरी देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **३.४** | **उथळपेठ गायमुख, चंद्रपूर - मुवसं (प्रा) चंद्रपूर** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र दिनांक २७.७.२०१६ अन्वये चिचपल्ली परिक्षेत्रांतर्गत मौजा उथळपेठ गायमुख येथे निगर्स पर्यटन विकास करण्यासाठी सन २०१६-१७ ते २०१८-१९ पर्यंतचा रु.२०८.८८ लक्षचा आराखडा सादर केलेला आहे.<br>चंद्रपूर जिल्हयातील सदर क्षेत्र गायमुख म्हणून आजूबाजूचे परिसरात प्रसिध्द आहे. निसर्ग पर्यटनांतर्गत कक्ष क्र.७३८ व ५१७ मध्ये ३०.०० हे. क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. सदर क्षेत्रात सध्यस्थितीत मंदीर, नैसर्गिक झरे, पुरातनकालीन पाण्याचे कुंभ आहे. त्यामुळे सदर क्षेत्राचा विकास झाल्यास वनाचे संवर्धन, जैवविवीधतांची वृध्दी, रोजगारांमध्ये वाढ, जल व मृदसंधारण व संवर्धन, पर्यटनास वाव तसेच वनाचे संरक्षण इत्यादी बाबीचे फायदे होतील. त्याद्दष्टीने सदर स्थळाचे महत्व असून भविष्यात धार्मिक भक्तगण व पर्यटकांची संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होण्याची शक्यता आहे.<br>रोपवन कामे ,सी.सी.टी. खोदतळे, सिंमेट ,बायो टॉयलेट, समाज मंदिर, चेनलिंग फेन्सींग, आर्टिफॅक्ट तयार करणे, पॅगोडा उभारणे, बोरवेल खोदणे, वॉच टॉवर, खेळाचे साहित्य, निसर्ग पायवाट, प्रसिध्दी बोर्ड, सोलर लाईट, ओटे ही कामे प्रस्तावित आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समिती, उथळपेठ मार्फत सदर स्थळाचे परीरक्षण करणे प्रस्तावित आहे. | प्रकल्प आराखडयास मंजूर देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| **३.५** | **चंदन-वंदन, नियतक्षेत्र बनवडी, वनपरिक्षेत्र कोरेगांव, सातारा वन विभाग, सातारा - मुवसं (प्रा) कोल्हापूर** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांनी सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाचे कालावधीकरीता रु.२९४.५० लक्षचा आराखडा सादर केलेला आहे. उपवनसंरक्षक, सातारा यांनी सदर आराखडयाबाबत सभेत माहिती दिली.<br>चंदन वंदन दुर्गजोडी कोरेगांव वनक्षेत्रात सातारा पासून २४ कि.मी.अंतरावर उभी आहे. या क्षेत्रास एतिहासीक/ धार्मिक महत्व आहे. या गडाच्या पायथ्याशी श्रावण महिन्यात या ठिकाणी मोठी यात्रा भरत असून प्रसिध्द दगही पीर दरगा सुध्दा अस्तित्वात आहे. या ठिकाणी दरवर्षी साधारणतः ५०००० हजार पर्यटक भेटी देत असतात. भविष्यात पर्यटकांसाठी हे एक उत्तम वनपर्यटन स्थळ होण्याची शक्यता आहे.<br>सदर स्थळ विकसित करण्यासाठी पॅगोडा, रेलिंग, फेरोक्रेट, स्वागत कमान, बोअरवेल, पाण्याची टाकी व पाईपलाई, मजूरकुटी / विश्रामगृह, निसर्ग पथावरील पाय-या निरीक्षण मनोरा, झुलता पुल, बोटेनिकल गार्डन वर्क, प्ले ग्राउंड व वन्यप्राणी प्रतिकृती, झाडांना चिरे दगडातील कटटे, निसर्ग पायवाट / निरीक्षण पथ, सौर पथ दिवे, | प्रकल्प आराखडयास मंजूर देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बायोडायजेस्टर टॉयलेट बसविणे, चित्ररुप माहिती फलक, उंच रोपांची लागवड ही कामे हाती घेण्यात येणार आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समिती, बनवाडी मार्फत सदर स्थळाचे परीरक्षण करणे प्रस्तावित आहे. | |
| **३.६** | **मौजे पिंपळगांव दौंड वनपरिक्षेत्र, जि. पुणे - मुवसं (प्रा) पुणे** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाकरीता रु.१७३.९३ लक्ष चा आराखडा सादर केलेला आहे. उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरणाद्वारे नियोजित पर्यटन स्थळाची माहिती दिली आहे.<br>सदर ठिकाणी फिरंगी मातेचे प्रसिध्द प्रा चीन मंदिर आहे. दररोज ३००-४०० भा विक / पर्यटक भेट देत असतात.<br>या आराखडयामध्ये जल व मृद संधारणाची कामे, निसर्ग पायवाटा, वनतळे, पणी साठवण टाक्या तयार करणे, माहिती फलक, निसर्ग निर्वाचन केंद्र उभारणे, लाकडी आभासाची कमान उभारणे, पक्षांसाठी घरटी लावणे, सिटींग बेंचेस बसविणे इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आली आहे. | सदर स्थळाचे परीरक्षण संयुक्त वनव्यवस्थापन समिती पिंपळगांव मार्फत करण्याचे अटिवर प्रकल्प आराखडयास मंजूर देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| **३.७** | **मौजे हडपसर (हांडेवाडी पुणे वनपरिक्षेत्र, जि. पुणे - मुवसं (प्रा) पुणे** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाकरीता रु.२३५.७८ लक्ष चा आराखडा सादर केलेला आहे. उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरणाद्वारे निसर्ग पर्यटन आराखडा ची माहिती दिली आहे.<br>मौजे हडपसर (हांडेवाडी) हे पुणे शहरामध्ये पुणे वनक्षेत्रातील मौजे हडपसर फॉ.स.नं.६० व ६२ मधील अतिक्रमण प्रवण १५ हे. क्षेत्रात नागरी उदयान विकसित करण्यात येणार आहे.<br>सदर पर्यटन स्थळ विकसित करण्याकरीता रोपांची लागवड करणे, माहिती फलक लावणे, पायवाट दुरुस्ती, झाडांच्या भोवती ओटे तयार करणे, सौर दिवे उभारणे, पर्यटकांना बसण्यासाठी बाक बसविणे, पॅगोडे उभारणे, पाण्याची टाकी, पाईप लाईन, पक्ष्यांची घरटी, फेब्रीकेटेड शौचालय उभारणे इत्यादी कामे प्रस्तावित केली आहेत. सदर स्थळाचे विकास केल्यानंतर दरवर्षी रूपये ९.०० लक्ष उत्पन्न अपेक्षीत असून प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या ३४०८ मनुष्य दिवस रोजगारनिर्मित होणार आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समिती, हांडेवाडी / हडपसर मार्फत सदर स्थळाचे परीरक्षण करणे प्रस्तावित आहे. | प्रकल्प आराखडयास मंजूर देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| **३.८** | **मौजे पाचगांव पर्वती, भांबुर्डा वनपरिक्षेत्र, जि. पुणे - मुवसं (प्रा) पुणे** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी सन २०१६-१७ ते २०१७-१८ या वर्षाकरीता रु.१५८.४० लक्ष चा आराखडा सादर केलेला आहे. उपवनसंरक्षक, पुणे यांनी सादरीकरणाद्वारे निसर्ग पर्यटन आराखडा/स्थळाची माहिती दिली आहे.<br>मौजे पाचगांव पर्वती पुणे शहरात आहे. पुणे महानगरपालिका पाचगांव पर्वती येथे वन विभागाची | प्रकल्प आराखडयास मंजूर देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ताब्यात २४५ हेक्टर जमीन असून सदर भागात वन पर्यटन क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. सध्या दररोज १०००-१४०० लोक भेट देत असतात.<br>सदर स्थळ विकसित करण्याचे दृष्टीने पाणतळी तयार करणे, माहिती फलक लावणे, पायवाट दुरुस्ती, झाडांच्या भोवती ओटे तयार करणे, सौर दिवे उभारणे, पर्यटकांना बसण्यासाठी बाक बसविणे, पक्ष्यांसाठी कृत्रिम घरटी तयार करण्याचे कामे प्रस्तावित करण्यात आली आहे. या स्थळाचे विकासामुळे दरवर्षी १७११२ मनुष्यदिवस रोजगार निर्मित होणार आहे. नागरी संयुक्त वनव्यवस्थापन समिती, पाचगांव पर्वती मार्फत सदर स्थळाचे परीरक्षण करणे प्रस्तावित आहे. | |
| **३.९** | **मौजा अजिंठा वनउदयान, ठाणा, औरंगाबाद - मुवसं (प्रा) औरंगाबाद** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद यांनी ६ वर्षाचा सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीचा रु.१३०.६२ लक्षचा आराखडा सादर केलेला आहे व त्यांनी सादरीकरणाद्वारे निसर्ग पर्यटन आराखडा / स्थळाची माहिती दिली.<br>अजिंठा वनउदयान, हे ठिकाण औरंगाबाद जिल्हयातील अजिंठा वनपरिक्षेत्रात मौजे ठाणा येथे आहे. या ठिकाणी इसवी सन पूर्व २ ते ७ व्या शतकातील जगप्रसिध्द अजिंठा बौध्द लेण्या या परिसरात आहेत. दरवर्षी किमान ५ ते ६ लक्ष पर्यटक या लेंण्यास भेट देत असतात. लेणीचे समोर वाघुर नदी वाहते व त्यापरिसरात ६७ हेक्टर वनक्षेत्र आहे. वनउदयान १८ हेक्टर क्षेत्रात विकसित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.<br>रोपवन, प्रवेशद्वार, कुंपन दुरुस्ती, प्रसाधन गृह, स्वच्छतागृह, विदयुत पुरवठा, भांडारगृह व संरक्षण कुटी, कॅक्टस गार्डन,मधुमक्षिकापालन, वाहनतळ, निसर्ग पायवाट, वनतळी हौद इत्यादी कामे करण्याचे प्रस्तावित करण्यात आली आहे. बोध्द ध्र्माच्या निगडीत व स्थानिकरित्या जगू शकणारे प्रजाती प्राधान्याने लावणे योग्य राहील. संयुक्त वन व्यवस्थापन समितीं ठाणे यांना पर्यटन स्थळाचा परिरक्षणाचे जबाबदारी देण्यात येईल. | प्रकल्प आराखडयास मंजूर देण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. |
| **३.१०** | **मौजा येलदरी निसर्ग पर्यटन केंद्र, औरंगाबाद - मुवसं (प्रा) औरंगाबाद** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद यांनी ५ वर्षाचा सन २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधीचा रु.५५९.१५ लक्षचा आराखडा सादर केलेला आहे. | **सदर प्रस्तावावर सभेमध्ये चर्चा झाली नाही.** |
| **३.११** | **चव्हाण यमाई तलाव परिसर शहर पंढरपूर - मुवसं (प्रा) पुणे** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांनी सन २०१६-१७ ते २०१७-१८ या २ वर्षाकरीता रु.३२९.०० लक्षचा आराखडा सादर केलेला आहे.<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा.नागपूर यांचे मार्फत प्रस्ताव | सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आल्याने कार्यकारी समितीकडून निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाचे मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे. | |
| **३.१२** | **निसर्ग परिसर केंद्र वाफा, शहापूर वन विभाग, शहापूर - मुवसं (प्रा) ठाणे** | मुख्य वनसंरक्षक (प्रा) ठाणे यांनी त्यांचे पत्र दिनांक १४.६.२०१६ अन्वये सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षाकरीता रक्कम रु.४८.४९ लक्ष चा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | प्रस्तावाचे सादरीकरण करण्याकरीता संबंधित अधिकारी उपस्थित झाले नसल्याने पुढीलसभेत विषय ठेवण्यास निर्णय घेण्यात आलेला आहे |

वरीलप्रमाणे देण्यात आलेली मान्यता ही खालील अटी व शर्तीच्या अधीन आहे.

१) आराखडयातील कामे करतांना वन संवर्धन अधिनियम १९८०, भारतीय वन अधिनियम , १९२७ , वन्यजीव (संरक्षण) अधिनियम , १९७२ मधील तरतूदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/ उच्च न्यायालय / केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना / आदेशांची अवहेलना होणार नाही याची दक्षता संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणा (उपविभागीय वन अधिकारी ) /विभागिय वन अधिकारी / उपवनसंरक्षक / वनसंरक्षक/ मुख्य वनसंरक्षक ) यांनी घ्यावी.

२) आवश्यक त्या कामांना योग्य ती तांत्रीक मंजूरी/ प्रशासकीय मान्यता स्वतंत्रपणे संबंधीत कार्यन्वयीन यंत्रनेने घ्यावी.

३) आराखडयातील कामांचे कार्यान्वयन करतांना विहीत वित्तीय अधिकार / वित्तीय नियमांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

**४. मंडळाचे मानचिन्हाला मान्यता देणे.**

या कार्यालयाचे पत्रदिनांक २४.५.२०१६ अन्वये मंडळाचे मानचिन्ह तयार करणेबाबत press note देण्यात आली होती. त्या अनुषंगाने दोन designer / यंत्रणांकडून लोगो प्राप्त झाले व त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. लोगो सादर करण्याकरीता अजुन जास्त वेळ देण्यात यावा व पुढील सभेमध्ये निर्णयासाठी ठेवणेबाबत निर्देश देण्यात आले.

**५. कार्यकारी समितीचे सदस्यांनी मांडलेले मुददे**

i. निसर्ग पर्यटन आराखडा तयार करण्यापूर्वी परिरक्षणाची जबाबदारी घेणेबाबत संबंधित संयुक्त वन व्यवस्थापन समितींचा ठराव घेण्यात यावा व ठरावाची प्रत प्रकल्प आराखडयात सहपत्रित करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

ii. विविध वन विभागात निसर्ग माहिती केंद्र स्थापित करण्यात आले असून निसर्ग शिक्षणासाठी त्यांचा योग्य वापर करण्यास निश्चित उपायायोजना आखुन कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

iii. सन २०१५-१६ वर्षात निसर्ग पर्यटन तज्ञ समितींकडून मंजूर आराखडयाप्रमाणे सन २०१६-१७ वर्षात विकास कामे करण्यास रु. १,९३.४७ लक्ष निधी आवश्यक असून फक्त रु.५७२४.८८ लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. नव्याने मंजूर आराखडे अंमलबजावणी करण्यास निधी शिल्लक राहणार नसल्याने या आराखडयास shelf वर ठेवावी व निधी उपलब्धतेप्रमाणे राज्य योजना / जिल्हा योजनांतर्गत विकास कामे हाती घेण्यात यावीत असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनी सूचित केले असून त्यास समितीने सहमती दर्शविली.

iv. सन २०१५-१६ या वर्षी सुरु केलेल्या अपूर्ण / बांधील कामाकरीता अनुदानाची मागणी क्षेत्रिय अधिका-यांना ठराविक वेळ देऊन प्रस्ताव मागवावा व शासनास पाठवावा असे सभेत सुचित केले.

v. विदर्भातील व्याघ्र प्रकल्पांची निसर्ग पर्यटन क्षमता मोठया प्रमाणात असून त्याचा पूर्ण उपयोग करण्याकरीता Golden Triangle सारखा टुर्स पॅकेजेस विकसित करण्यात यावेत असे प्रो.निशीकांत मुखर्जी यांनी सूचित केलेले आहे.

vi. पर्यटन विकास बृहत आराखडा मध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या / वनविभागाने पुर्वी निवडलेल्या स्थळांचा विकास करण्यास प्राधान्य देणे आवश्यक आहे व प्रकल्प आराखडा तयार करण्याकरीता त्वरित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील असे सदस्य सचिवांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

**शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठकीचा समारोप करण्यात आला.**

स्वा/-

**सर्जन भगत**

**अध्यक्ष, कार्यकारी समिती तथा**

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख)**

**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**परिशिष्ट-१**

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितिची द्वितीय बैठक, दिनांक २० ऑगष्ट, २०१६**

**(i) कार्यकारी समितीचे पदाधिकारी**

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री. सर्जन भगत,भा.व.से, | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) म.रा. नागपूर |
| २. | श्री.श्रीभगवान, भा.व.से., | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर |
| ३. | श्री.बि.एस.के.रेडडी, भा.व.से., | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा.नागपूर |
| ४. | डॉ.एस.एच.पाटील, भा.व.से., | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) नागपूर |
| ५. | श्री.आर.एस.यादव, भा.व.से., | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर यांचे प्रतिनिधी |
| ६. | श्री.हनुमंत के.हेडे | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी |
| ७. | श्री. संजय करकरे | सदस्य | सहायक संचालक, बी.एन.एच.एस., नागपूर |
| ८. | श्रीनिधी नांदेडकर ॲण्ड असोसिएटस, नागपूर | सदस्य | निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे वास्तुशास्त्रज्ञ, नागपूर |
| ९. | प्रो.निशी के. मुखर्जी | सदस्य | निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे विशेषज्ञ, नागपूर |
| १०. | श्री. दिलीप आर. चिंचमलातपूरे | सदस्य | निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे तज्ञ, नागपूर |
| ११. | श्री.एन.रामबाबू, भा.व.से., | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |

**(ii) उपस्थित निमंत्रीत अधिकारी**

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. ए.आर.मंडे | मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद |
| २. | श्री. एस.एस.डोळे | महाव्यवस्थापक, उत्तर चंद्रपूर प्रदेश |
| ३. | श्री. सत्यजित गुजर | उपवनसंरक्षक, पुणे |
| ४. | श्री. अ. मो. अंजनकर | उपवनसंरक्षक, सातारा |
| ५. | श्री. आर. टी. दाबेकर | विभागिय वन अधिकारी , चंद्रपूर |
| ६. | श्री. एस.बी. पाटील | विभागिय व्यवस्थापक, प. चंद्रपूर |
| ७. | श्री. जे.व्ही. जाधव | सहा. वनसंरक्षक, औरंगाबाद |